# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६३ वा ❑ मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भीक मागणे हा जीवन जगण्याचा अधिकार

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

राज्यात भीक मागण्यावर पूर्णपणे प्रतिबंध घालणारे विधेयक विधान परिषदेत अनेक सदस्यांच्या कडाक्याच्या विरोधात आणि सभागृहात गोंधळाच्या वातावरणात मंजूर करण्यात आले. या विधेयकामुळे आता राज्यात भी मागणे हा गुन्हा ठरणार असून त्यावर कठोर कारवाईची तरतूद आहे मात्र विधेयकाच्या मूळ उद्देशापासून दूर गेलेल्या या बदलामुळे सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पक्षांकडून ही टीका होत आहे.

भीक मागणी हा मूलभूत अधिकार जरी नसला तरी जगण्याचा अधिकार (कलम २१) आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा (कलम १९(१)()) भाग म्हणून काही न्यायालयांनी भीक मागणे हे गुन्हेगारी ठरवणाऱ्या कायद्यांना आव्हान दिले आहे, कारण गरिबीमुळे लोक भीक मागतात आणि त्यांना गुन्हेगार ठरवणे हे त्यांच्या हक्कांचे उल्लंघन आहे, असे मत मांडले आहे. त्यामुळे, भीक मागणे हा गुन्हा नसून एक सामाजिक समस्या आहे, ज्यावर कायद्याने नव्हे तर पुनर्वसन आणि मूलभूत गरजा पुरवून उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे न्यायालयीन निकालांमधून समोर आले आहे.

जेव्हा सरकार अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजा पुरवण्यात अयशस्वी ठरते, तेव्हा लोकांना भीक मागावी लागते. अशा परिस्थितीत त्यांना गुन्हेगार ठरवणे हे जगण्याच्या हक्काचे उल्लंघन आहे, असे म्हटले जाते.काहीवेळा, भीक मागणे हे भुकेची किंवा दयनीय परिस्थितीची अभिव्यक्ती मानली जाते, जी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा एक भाग असू शकते.

यासंदर्भातसुप्रीम कोर्टाने दिल्ली उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन कायम ठेवून भीक मागणे गुन्हा नाही, असे म्हटले आहे.

भीक मागणाऱ्यांना गुन्हेगार ठरवणे हे असुरक्षित घटकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, असेही न्यायालयाने निदर्शनास आणले आहे.

अनेक राज्यांमध्ये अजूनही भीक मागण्याविरोधी कायदे आहेत, जे पोलिसांना भीक मागणाऱ्यांना अटक करण्याचा अधिकार देतात.

हे कायदे आणि त्यांच्या अंमलबजावणीमुळे लोकांचे मूलभूत हक्क धोक्यात येत असल्याने, या कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, असे मत मांडले जाते.

थोडक्यात, भीक मागणे हा थेट अधिकार नसला तरी, अनेक कायदेशीर आणि मानवाधिकार तज्ज्ञ याला जगण्याचा आणि अभिव्यक्तीचा अधिकार मानतात, ज्यावर गुन्हेगारी स्वरूपात नव्हे तर सहानुभूती आणि मदतीच्या भूमिकेतून उपाय करणे आवश्यक आहे.

२०२१ मध्येही, हे एक कठोर वास्तव आहे की आपले सरकार आपल्या सर्व नागरिकांना जगण्याच्या अधिकाराच्या साध्या गरजा पुरवू शकले नाही.प्रत्येक सरकारची सर्वोच्च प्राथमिकता म्हणजे आपल्या नागरिकांना मूलभूत गरजा – आरोग्य, निवारा आणि अन्न –पुरवणे. जेव्हा एखादा देश या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरतो तेव्हा अवलंबून असलेल्यांची भिकारींची – संख्या वाढते. लोक रस्त्यावर भीक मागतात कारण त्यांना ते हवे असते असे नाही तर त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नसतो म्हणून. आणखी कलंक म्हणजे बहुतेक ठिकाणी भीक मागणे हा गुन्हा मानला जातो, ज्यामुळे बेघर लोकांचे जीवन दयनीय बनते.

आपले सरकार सर्व नागरिकांना जगण्याच्या अधिकाराच्या साध्या गरजा पुरवण्यात असमर्थ ठरले आहे. प्रत्येक शहरात, सिग्नलवर, मोक्याच्या ठिकाणी, देवळासमोर हजारोंच्या संख्येने भिकारी भीक मागताना दिसतात.हे प्रातिनिधिक चित्र आहे.

भारतात भीक मागण्याला शिक्षा करणारा कोणताही केंद्रीय कायदा नाही. तरीही, २२ राज्यांमध्ये (काही केंद्रशासित प्रदेशांसह) भीक मागण्याविरोधी कायदे आहेत. मुंबई भीक मागण्या प्रतिबंधक कायदा (१९५९) हा राज्यातील सर्व भीक मागण्याविरोधी कायद्यांसाठी आदर्श आहे. या कायद्यात भीक मागण्याच्या पहिल्या दोषी आढळल्यास तीन वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा आणि नंतरच्या दोषी आढळल्यास दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.मात्र एखाद्याची अंमलबजावणी होते का?

२०१८ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने राजधानीत भीक मागणे हा गुन्हा ठरवणारा कायदा रद्द केल्यानंतर, या वर्षाच्या सुरुवातीला, जुलै २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्ता कुश कालरा यांची जनहित याचिका फेटाळून लावली, ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी आणि वाहतूक चौकातून सर्व भिकाऱ्यांना हटवण्याची मागणी करण्यात आली होती.सर्वोच्च न्यायालयाने याला एक सामाजिक–आर्थिक समस्या म्हणून वर्णन केले आणि भिक्षा मागण्यावर पूर्णपणे बंदी घालणे हा ''उच्चभ्रू दृष्टिकोन'' असेल.

भीक मागणे हा गुन्हा मानावा की नाही याबद्दल आपल्या देशातील भाग्यवान लोकांमध्ये अजूनही अनेक वादविवाद आहेत. काही जण या कल्पनेचे समर्थन करतात, तर काहीजण त्याचा विरोध करतात.

लोक सहसा भीक मागण्यास प्रवृत्त होतात अशी अनेक आर्थिक कारणे आहेत. गरिबी, बेरोजगारी, अर्ध–बेरोजगारी आणि उत्पन्नातील घट हे सर्व विचारात घेण्यासारखे महत्त्वाचे घटक आहेत. भिक्षा मागण्यास कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक घटकांमध्ये वंशपरंपरागत व्यवसाय, कौटुंबिक अव्यवस्था आणि विधवात्व यांचा समावेश आहे.

दुष्काळ, भूकंप, दुष्काळ, चक्रीवादळ किंवा पूर यामुळे कधीकधी आपले भौतिक वातावरण अत्यंत निराशाजनक असू शकते. या सर्व नैसर्गिक आपत्तींमुळे मालमत्तेचे आणि शेतीचे गंभीर नुकसान होऊ शकते, ज्यामुळे लोकांना घरे सोडून जावे लागते आणि उपासमारी कमी करण्यासाठी भीक मागावी लागते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण ४,१३,६७० भिकारी होते, ज्यात २,२१,६७३ पुरुष आणि १,९१,९९७ महिला होत्या; सर्वात जास्त भिकारी पश्चिम बंगालमध्ये (८१,२४४) आहेत, त्यानंतर उत्तर प्रदेशचा क्रमांक लागतो, परंतु सध्याच्या आकडेवारीनुसार ही संख्या वाढली असण्याची शक्यता आहे.

हे आकडे २०११ च्या जनगणनेवर आधारित आहेत. सध्या, मीडिया रिपोर्ट्स आणि सरकारी अंदाजानुसार ही संख्या ४ लाखांवरून ५ लाखांपर्यंत किंवा त्याहून अधिक असू शकते, कारण ही संख्या सतत बदलत असते आणि २०११ नंतर नवीन जनगणना झालेली नाही.

भारतातील भिकाऱ्यांचे मासिक उत्पन्न हे ठिकाण, गर्दी किंवा शहरावर अवलंबून असते. कोणत्याही अधिकृत सर्वेक्षणात भिकाऱ्यांच्या उत्पन्नाची अचूक माहिती उपलब्ध नाही परंतु असा अंदाज आहे की एक सामान्य भिकारी दररोज १००– ५०० रुपये कमावतो.

## छ.संभाजीनगरमध्ये २७ डिसेंबरला प्रगतिशील साहित्य संमेलन

### प्रगतिशील लेखक संघ आणि विवेकानंद महाविद्यालय यांच्या वतीने आयोज

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – संविधान मूल्यांचे संवर्धन व प्रतिष्ठा या संकल्पनेवर आधारित प्रगतिशील साहित्य संमेलन, छत्रपती संभाजीनगरमध्ये विवेकानंद महाविद्यालय, समर्थनगर येथे शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी होऊ घातले आहे. ज्येष्ठ ग्रामीण कथाकार तथा कादंबरीकार उत्तम बावस्कर हे संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले असून स्वागताध्यक्ष म्हणून विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव श्रीमंतराव शिसोदे हे असणार आहेत. माजी संमेलनाध्यक्ष ॲड. मिर्झा अस्लम यांची प्रमुख उपस्थिती राहील.

मुंबई येथील प्रसिद्ध लोककवी तथा गीतकार प्रशांत मोरे हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. नाशिक येथील प्रसिद्ध कादंबरीकार तथा प्रगतिशील लेखक संघाचे राज्य महासचिव राकेश वानखेडे हे समारोपाचे प्रमुख अतिथी म्हणून तर ज्येष्ठ विज्ञान लेखिका प्रा. सुनीती धारवाडकर आणि प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या संमेलनात उद्घाटन समारंभ आणि समारोप समारंभ याशिवाय माध्यमे आणि लोकशाही प्रजासत्ताकात विचार स्वातंत्र्याची आवश्यकता या विषयावर ज्येष्ठ विचारवंत प्रा. जयदेव डोळे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. या परिसंवादात वेगवेगळ्या माध्यमांच्या

स्वतंत्र्यता, समता, सृजनता के लिए प्रतिबद्ध

अनुषंगाने डॉ. किशोर शिरसाट, रोशनी शिंपी, दत्ता कानवटे, अनिकेत मोहिते भाष्य करणार आहे.

संविधान मूल्यांचे संवर्धन व प्रतिष्ठा या विषयावर ॲड. अभय टाकसाळ यांच्या अध्यक्षतेखाली खुली चर्चा होणार असून, संविधान अभ्यासक अनंत भवरे हे संवाद साधणार आहेत. शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर आत्माराम पाटील यांच्या शाहीरीवर आधारित अजिंक्य शाहीरी हा कार्यक्रम शाहीर अजिंक्य लिंगायत आणि संच सादर करणार आहे.

समरोपानंतर कवयित्री उर्मिला चाकूरकर यांच्या अध्यक्षतेखाली बहुभाषिक खुल्या कवी संमेलनात मान्यवर कवींसह नवोदित कवींना एकत्रित सहभागी करून घेतले जाणार आहे. या संमेलनाचे आयोजन प्रगतिशील लेखक संघ, छत्रपती संभाजीनगर ही संस्था विवेकानंद महाविद्यालयाच्या सहकार्याने करीत आहे. प्रगतिशील लेखक संघाच्या वतीने शहरात सातत्याने लोकवर्गणीतून साहित्यिक उपक्रम चालविले जाते.

साहित्य रसिकांनी व श्रोत्यांनी या संमेलनात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रगतिशील लेखक संघाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडगे, विवेकानंद महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख तथा मराठी संशोधन केंद्र प्रमुख डॉ. दत्तात्रय डुंबरे, प्रगतिशीलचे उपाध्यक्ष डॉ. शेख इक्बाल मिन्ने, सचिव डॉ. समाधान इंगळे, सहसचिव आशा डांगे, मराठवाडा संघटक सुनील उबाळे, कोषाध्यक्ष डॉ. सोमनाथ वांजरवाडे, सदस्य डॉ. सविता लोंढे, चक्रधर डाके, माधुरी चौधरी, डॉ. नवनाथ गोरे यांनी केले आहे.

## संगीत नाटकाला उर्जा देणारे विद्याधर गोखले




**ज्योतिर्मय साहित्य**

६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे १२,१३,१४ फेब्रुवारी १९९३ रोजी संपन्न झाले. या संमेलनाचे अध्यक्ष होते विद्याधर गोखले. या संमेलनापूर्वी ते अध्यक्षपदाचे उमेदवार असल्याने त्यांचे साताऱ्यात २–३ वेळा येणेही झाले होते. विशेषतः माझे मित्र सुरेश साधले यांचे त्यांच्याशी असलेले ऋणानुबंध अगदी जवळचे होते. त्याकाळी संयोजन करणाऱ्या संस्थेकडे काही मतांचा अधिकार असे. संयोजन करणाऱ्या संमेलन समितीने मतांचे अधिकार ज्या ज्या व्यक्तींना दिले होते त्यांनाही भेटण्यासाठी ते येत होते. माझा त्यांचा संबंध त्याकाळात त्यांच्याशी वृद्धींगत झाला. विशेषतः सुरेश साधले आणि मी त्यांच्याबरोबर विविध ठिकाणी संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीसाठी मतदारांपर्यंत गेलो होतो. मी या संमेलनाचा कोषाध्यक्ष असल्याने मलाही मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. विद्याधर गोखले आणि यदुनाथ थत्ते यांच्यामध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये विद्याधर गोखले ६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडून आले होते. संमेलनकाळात त्यांचा मुक्काम दैनिक ऐक्यचे शरद पळणिटकर यांच्या एलआयसी कॉलनी, गेंडामाळ – सातारा येथील बंगल्यावर होता. विद्याधर गोखले यांच्याबरोबर विविध विषयावर गप्पा मारण्यासाठी आमचा रोजचाच पळणिटकर यांच्या बंगल्यावर त्या काळात वावर होता. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर नाटककार आणि विशेषतः संगीत नाटकाला उर्जा देणारे विद्याधर गोखले नाशिक येथे वि.वा. शिखाडकर (कसुमाग्रज) यांना भेटण्यासाठी नाशिकला गेले होते. कुसुमाग्रज त्यांना तिळगुळ देत असलेला फोटो ६६ व्या संमेलनाच्या अजिंक्य या स्मरणिकेत आहे. शेजारीच असलेल्या कोपऱ्यातील टीपॉयवर राम गणेश गडकरींचा फोटो या फोटोमध्ये दिसत आहे. अवघ्या ३४ वर्षाच्या आयुष्यात राम गणेश गडकरींनी मराठी नाटक, काव्य आणि विनोदलेखन या तिन्ही क्षेत्रांत उच्च प्रतीचा दर्जा निर्माण केला आणि नंतरच्या पिढ्यांना त्यात वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) सारख्या नाटककारांनाही, कलात्मक निकष आणि भाषिक उंचीचा आदर्श दिला. त्यामुळे शिरवाडकर यांनी गडकरी यांचे जे मुल्यमापन केले आहे त्यात ''लहान आयुष्य, पण दीर्घकाळ टिकणारी साहित्यसंपदा निर्माण करणारे'' असामान्य नाट्यकार असे त्यांचे वर्णन केले आहे. शिरवाडकर यांनी गडकरींच्या नाटकातील हास्यरस आणि करुणरस यांचा अनोखा संगम हा प्रमुख पैलू उघड केला आहे. त्यांच्या मते, गडकरींच्या नाटकांमध्ये आत्यंतिकता ही शैलीची खासियत असून, व्यक्तिरेखांची विभागणी या दोन रसांच्या आधारावर होते, ज्यामुळे नाटके भावनिक तीव्रतेने भरभरुन उठतात. त्यांच्या मते गडकरींनी मराठी रंगभूमीला आधुनिकतेची जाणीव, चरित्रांची अंतर्गत गुंतागुंत आणि भाषेतील काव्यमय तेज एकत्र दिले. शिरवाडकरांनी गडकरींच्या संवादातील कोटिबाजपणा, काव्यात्मकता आणि पल्लेदारपणा यांचे विशेष उल्लेखनीय मुल्यमापन केले, ज्यामुळे नाटके मराठी सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली असे म्हंटले आहे. एकच प्याला हे गडक–यांचे नाटक शोकांतिकेच्या रूपात मराठी नाट्यसृष्टीला वळण देणारे ठरले असेही शिरवाडकर यांनी म्हंटले आहे. वि.वा. शिरवाडकर मडगाव (गोवा) येथे १९६४ साली संपन्न झालेल्या ४५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. गडकरी ज्यांना गुरु मानत ते श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुणे येथे १९२७ साली जे १३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले त्याचे अध्यक्ष होते. राम गणेश गडकरी यांचा जन्म २६ मे १८८५ रोजी झाला आणि निधन २३ जानेवारी १९१९ रोजी झाले. तर त्यांच्या पत्नी रमाबाई गडकरी यांचे निधन ६ ऑगस्ट १९९५ रोजी झाले. राम गणेशांच्या नावाने आलेले वैधव्य हेच आपले सौभाग्य हीच रमाबाई गडकरी यांची भावना निधन होईपर्यंत होती.



**शिरीष चिटणीस**
**सातारा मो. 75888 65051**

'लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्यावतीने राम गणेश गडकरींच्या स्मृती शताब्दीनिमित्ताने त्यांच्या साहित्यावर २१, २२ डिसेंबर २०१८ रोजी आम्ही राम गणेश गडकरी साहित्य महोत्सव पुणे येथे मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात आयोजित केला होता. गडकरी यांच्या साहित्यावर ज्येष्ठ विचारवंत विनय हर्डीकर यांनी उद्घाटनपर भाषण केले तर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक, वक्ते प्रा. मिलींद जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. लेखिका प्रा. डॉ. वर्षा तोडमल यांनी तपस्वी गडकऱ्यांची नाट्यतपस्या, समीक्षक प्रा. डॉ. वैजयंती चिपळूणकर यांनी राम गणेश गडक–यांची विनोदसृष्टी, जेष्ठ साहित्यिक प्रा. विश्वास वसेकर यांनी मला भावलेले गडकरी, लेखिका प्रा.डॉ. सुजाता शेणई यांनी गोविंदाग्रजांची कविता, समीक्षक डॉ. विनायक गंधे यांनी एकच प्यालाच्या समीक्षेची समीक्षा, लेखक प्रा. विलास करपे यांनी गडकरींची भाषाशैली, लेखिका प्रा. डॉ. रूपाली शिंदे यांनी मराठी साहित्यावरील गडकरींचा प्रभाव या विषयावर आपापले विचार व्याख्यानाच्या रूपाने गुंफले. संयोजनामध्ये सहभागी असलेले दै. केसरीचे वृत्त संपादक, लेखक स्वप्नील पोरे यांनी भारताचे माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांचे जाज्वल्य गडकरी प्रेम यावर व्याख्यान दिले.

**(क्रमशः)**

## मानसिक शांतता मिळविण्यासाठी भगवद्गीतेचे वाचन करा-गोखले



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – जीवनामध्ये वाटचाल करताना काय चांगले आणि काय वाईट हे नेमकेपणाने कळण्यासाठी भगवद्गीतेचे वाचन सहाय्यभूत ठरते तसेच आजच्या धकाधकीच्या काळात मानसिक शांतता मिळविण्यासाठी गीतेचे नियमित वाचन करावे असे आवाहन भाग्यश्री गोखले यांनी केले. पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या मासिक मेळाव्यात त्या बोलत होत्या. लिनियर गार्डन परिसरात शनिवारी संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सदरील मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात संस्थेचे सदस्य डॉ. विलास भाले यांचा नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कृषी परिषदेत ''जीवन गौरव'' पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. आगामी पिंपरी चिंचवड मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुप्रिया पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मेळाव्याचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन संस्थेच्या उपाध्यक्षा स्नेहा चिंचवडकर यांनी केले. विलास जोशी यांच्या अध्यक्षीय समरोपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख -११७



*आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' या लघु लेखमालेत अनेक घटकांचं, या पेंटींग मध्ये काय स्थान आहे? कसं महत्व आहे? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा प्रयत्न या 'पेंटींग' मध्ये वापरल्या जाणाऱ्या रंगाचा गडदपणा, फिक्कटपणा यावर पेंटींग मधील भास-आभासांच्या बरोबरच सकारात्मक नकारात्मकतेचा देखील परिणाम अनुभवायला मिळतो. आपल्यातील बऱ्याच जणांना रंगांकडे पाहतांना ठराविक अनुभव येतातच. असे अनुभव येणे हे जीवन जगण्याचं लक्षण मानलं जातं.*

*खूपदा गडद रंगांपेक्षा फिक्कट रंगांकडे पाहून आपल्याला समाधान वाटतं. ही समाधान वाटण्याची स्थिती, एक प्रकारची आध्यात्मिक अवस्थाच असते. आपल्या डोळ्यांना गडद रंग लवकर दिसतात परंतु फिक्कट रंग हे मनाला अधिक भावतात. जे दिसतं किंवा डोळ्यांना जे पहायला मिळतं ते प्रत्यक्षात तसंच असतं, असं होत नाही मात्र जे मनाला वाटतं, तेच अधिक योग्य असतं. आपल्या कडे एक म्हण आहे, "जसं दिसतं तस नसतं म्हणून जग फसतं" ते अगदी सत्य आहे. कुठलीही वस्तु वा व्यक्ती दूरुन सुंदर वा प्रबळ दिसेलही, परंतु जवळ गेल्यावर किंवा त्या व्यक्तीचा स्वभाव कळाल्यानंतर आपले "समज" हे "गैरसमज" होते असं आपल्या ध्यानात येतं म्हणूनही आपल्याला फिक्कट रंग अधिक सुखावून जातात. फिक्कट रंग हे शेवटी पांढऱ्या रंगात विलीन होतात 'पांढरा' हा निर्मळ, सकारात्मक, स्वच्छ आणि पवित्र मनाचं प्रतिक आहे.*

*"वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये आपण 'पेंटींग' अधिक सुंदर कसे दिसेल, हे न पाहता, त्याच्यातील रंग घटकांचा मनांवर 'सकारात्मक' च प्रभाव कसा होईल, याकडे अधिक लक्ष देतो. तेव्हा अशा सकारात्मक रंग संकल्पनांचे 'पेटींग आपल्या रोजच्या पाहण्यात येत असते. तेव्हा त्या कुटुंबातील व्यक्ती देखील आपल्या स्वांतसूखाय व्यवहारी जगात 'सकारात्मक' बनत जाते. त्यामुळे "वास्तुशास्त्र पेंटींग" वास्तुत लावल्या नंतर फार लवकर सकारात्मक वातावरण निर्माण होऊ लागते. म्हणून रंगातील गडद-फिक्कट पणा, जसे पेंटींग मध्ये विविध आभास निर्माण करतात. त्याच प्रमाणे प्रत्येक रंग छटे कडून निघणारी तेजो किरणे, व्यक्तीवर आणि त्या वास्तु वर अपेक्षित परिणाम करतात.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

आखाजी सणाला
गौराईला केला साज
वेणी, फणी, काप,,
मोरणी ठसकेबाज ||३९७||

आखाजी सणाला
गौराईची म्हणा गाणी
साल जाऊ दे चांगल
डोलू दे पीकपाणी ||३९८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# विवाह : संस्कार की इव्हेंट मॅनेजमेंट ?




ज्योतिर्मय साहित्य

पूर्वी घरातील लग्नसमारंभ वा अन्य कोणताही कार्यक्रम असला तर घरातील किंवा नात्यातील लोक एकत्र येऊन त्या कार्यक्रमाची जबाबदारी वाटून घेत असत. हल्ली कोणालाच वेळ नसतो. त्यामुळे एका दृष्टीने इव्हेंट मॅनेजमेंट सारख्या गोष्टी या काळाची गरज आहेतच. त्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो. सोहळा अधिक आकर्षक आणि देखणा होतो. इंग्रजी शब्द वापरायचा तर कॅची होतो. पण त्यातील नैसर्गिकपणा, गाभा कुठेतरी हरवून जातो.



अनेक नवीन गोष्टी या लग्नसोहळ्यासारख्या पारंपरिक कार्यक्रमात शिरल्या आहेत. त्या चांगल्या की वाईट हे जाणकारांनी ठरवावे. अशा गोष्टींमध्ये प्री वेडिंग शूट, वेगवेगळ्या पोझिशन्समध्ये फोटो काढणे, लग्नाच्या आधी वधूवरांनी एकत्र येऊन डान्स करणे, ते डान्स बसवण्यासाठी आधी सराव करणे, त्यासाठी अगदी कोरिओग्राफरची मदत घेणे या गोष्टी होत असतात. एका लग्न समारंभात तर एका बाजूला विधी सुरू होते आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या पडद्यावर वधू-वरांचे प्री वेडिंग शूट दाखवण्यात येत होते. जमलेली सगळी मंडळी हे प्री वेडिंग शूट पाहण्यात मग्न होती. लग्नाचे जे विधी सुरू होते, त्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. फक्त वधू वर, त्यांचे आई-वडील आणि गुरुजी एवढेच त्या सोहळ्यात मग्न होते. मला हा सगळा प्रकार विचित्र वाटला.


वर सांगितलेल्या सगळ्या गोष्टींच्या निमित्ताने वधुवर लग्नापूर्वीच अनेकदा एकत्र येत असतात. त्यातून कदाचित एकमेकांना अधिक जाणून घेणे, आवडीनिवडी समजून घेणे यासारख्या गोष्टींनाही मदत होत असावी. पण लग्नानंतर एकमेकांच्या सहवासाची जी उत्सुकता असते ती नक्कीच हरवत असावी. कसा असेल माझा जीवनसाथी ? तो मला समजून घेईल का ? अशा अनेक गोष्टींची उत्सुकता असते. मधुचंद्राचा रोमांचक कालावधी असतो परंतु या सगळ्या गोष्टी या आधुनिकतेच्या गडबडीत हरवत असाव्यात.

हृदयनाथ मंगेशकर यांनी गायलेले एक छान गाणे आहे.

लाजून हासणे अन् हासून ते पहाणे
ी ओळखून आहे सारे तुझे बहाणे

किती सुंदर ओळी ! या गोष्टी जेव्हा दोघे अनोळखी असतात आणि एकमेकांच्या सहवासासाठी उत्सुक असतात तेव्हाच त्यातील गोडी अधिक असेल हे सुज्ञास सांगणे न लगे.

जे जे नवीन आणि आधुनिक तेथे सगळेच वाईट आहे असे नाही काळानुसार काही गोष्टी बदलायला हव्यातच आपणही जुन्या गोष्टी टाकून देऊन नवीन गोष्टींचा स्वीकार करायला हवा परंतु जुन्या गोष्टी सगळ्याच टाकाऊ नसतात किंवा सगळ्याच नवीन गोष्टी चांगल्या असतात असेही नाही म्हणून दोघांचा सुवर्णांमध्ये साधता आला पाहिजे हा जेव्हा होईल तेव्हा आपले जीवन अधिक, आनंदी, सुखी आणि समाधानी होईल. आपल्या मुलांच्या लग्नात खर्चाचे पारडे जड असावे की संस्कारांचा भाग महत्वाचा असावा हे संबंधितांनी विचारपूर्वक ठरवणे आवश्यक आहे. ****



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# अनिर्वाच्यनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ६ समास१०


नमस्कार,

सतत संताच्या संगतीत रहावे सज्जनांच्या बरोबर असले की आपले आचार विचार देहबोली सगळेच सात्विक होते. समाधान म्हणजे ब्रम्हज्ञान, अनुभवण्यासारखी गोष्ट, वेदांचे रहस्य, केवळ अनुभव अगदी शुध्द जाणीव ही तर समाधानाची जागा आहे. समाधान शब्दांत सांगता येत नाही. पण ते सांगितल्यावाचून कळणारही नाही. ईथे समर्थानी पहिल्याच ओवीत गुळाची ऊपमा दिली आहे. गुळ खाल्यावर जसे समाधान होते. म्हणजे समाधान हे स्थिरबुध्दीचे लक्षण आहे असे मला वाटते. म्हणून सद्गुरू चरणीं समाधान मिळवावे.

सद्गुरू जे सांगतात त्याप्रमाणे वागले तर समाधान मिळणें अवघड नाही. प्रथम सद्गुरू सांगतात की मी कोण आहे याचा शोध घेता घेता स्वस्वरूप साक्षात्कार होतो. मी जो खोटा मुखवटा घालुन फिरत होतो तो मी नाहींसा होऊन परमात्म्याशी एकरूप होतो. तदाकार पावतो आत्मानंद मिळतो समाधी अवस्था प्राप्त झाली. व मी ब्रम्ह आहे हा अनुभव येतो.

जिकडेतिकडे ब्रम्हचं दिसु लागते अशी अवस्था येते तेथे पूर्ण समाधान होते. जो स्वतःचा शोध घेतो त्यालाच सदगुरुचां आशिर्वाद म्हणजे काय ते कळते. पुढे मग आत्मवस्तु हळूहळू कळू लागते. बुध्दीचा घट्ट निश्चय करावा तो करत असताना आपल्यातील ''मी''पण शोधावा. अशाप्रकारेआपले मुळस्वरूप नीट ऊलगडले तर देहबुध्दीतील आपण मायानिर्मित आहोत असे समजेल. देहबुध्दीतील अशाश्वत ''मी''बाजुला काढला की शुध्द आत्मवस्तु शिल्लक रहाते तेच समाधानाचे ठिकाण आहे. मित्रांनो समर्थ आपल्याला प्रत्येक शब्दाचा अर्थ आपल्या रोजच्या जीवनातील निगडीत गोष्टींची तुलना करून देतात. की आपल्याला ते सहज सोपे वाटावे. आता हेच बघानां शब्द व अर्थ यांचा संबंध ते धान्या आणि भुसा (भुसकट) अशा स्वरूपात आपल्याला सांगतात. **(क्रमशः)**

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

# ॥ अनुभूती ॥

रामकृष्ण औसेकर
सिंहगड रोड, पुणे. मो. 98228 15640

## एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला



ज्योतिर्मय साहित्य

''म्हणती गुरू त्याला । चालवी सांप्रदाय आपुला''


श्री गुरूमहाराज दत्त अवधुत पंथाचे एकनिष्ठ भक्त ते ह्या भक्ती पासुन कधी ही ढळले नाहीत, घरातच दत्त म्हटल्यावर तो प्रश्न उद्भवत नाही. दत्त अवधुत पंथा मध्ये त्यागी ध्रुवा सारखे रुपात पाहतो तसे श्री दत्ताबुवा महाराजांना दोन्ही रुपात पहात होतो. दत्त म्हणजे श्री महाराज आणि महाराज म्हणजेच श्री दत्त. व्दैत, अद्वैत भावच नाही. अशा महान विभुतीच्या सत्संग घडणे आयुष्यात अतिशय दुर्मिळच बाब म्हणावी लागेल. कदाचित अनेक जन्माचा पुण्याचा संचय असु शकतो तेंव्हा असा योग योतो, गुरू शिवाय गती नाही म्हणुन ही सत्संग ती मला लाभली असावी अध्यात्मज्ञान हे सद्गुरू कडुनच प्राप्त होते असते आणि जीवनाला परमगती म्हणजे म्हणजे मोक्ष ही सद्गुरू कृपेनेच प्राप्त होत असते. अशा या महान विभुतीची भेट बीड शहरात झाली, हा एक योगा योगच म्हणावा लागेल, श्री महाराजांच्या आठवणीच्या संदर्भात लिहायचे म्हटले तर पुष्कळ आहे. तरी ह्यात काही ठळक असे अनुभवांचे प्रकटीकरण करीत आहे.

माणसाच्या जीवनात एक असा काळ असतो की, तो त्यात परिवर्तन घडवीत असतो त्याची कल्पना कालांतराने येत असते. बीड काही माझ गाव नव्हे अनोळख्या अशा ठिकाणी माझी बँकेतुन बीड शाखेत बदली झाली होती. साधरण १९७१ - ७२ चा तो काळ असावा, मी त्या वेळी ज्या वाड्यात राहत होतो. तसेच श्री महाराज पण राहत होते दररोजच्या भेटीत त्यांचा परिचय झाला. परंतु प्रथम भेटी पासूनच माझ्या मनांत एक वेगळा स्नेह भाव होता की, ही कुणी साधी व्यक्ती नाही. अशी माझ्या मनाची ठाम धारणा झाली होती, लहानपणा पासूनच घरात श्री दत्ताची उपासना भक्ती होती. त्यात मला इथे दत्त सांप्रदायातील विभुतीचा सत्संग आपल्याला मिळतोच याचा आनंद झाला. जीवनातील एक वेगळी दिशा वेगळा मार्ग मिळाला बीड मध्येच, ते दुसरीकडे जवळच राहण्यास गेले परंतु भेटीत अंतर कधीच आले नाही. दररोज त्यांच्या दर्शनाचा लाभ होत असे याच सत्संगातुन श्री दत्त पंचपदी दर गुरूवारी करण्याचे ठरले वेळ रात्री आठ साडे आठची अशा वेळा ठरल्या श्री महाराज सरकारी नोकरीत त्या कामाच्या ताणामुळे पंचपदीची वेळ साधत आमच्या बँकेच्या वेळ जरी साडेपांच असला तरी सुद्धा साडेपाचला मी कधीच आलो नाही, तेवढच एक दीड तास तरी परमेश्वराचे नामस्मरण घडत असे. त्या वेळी महाराजांची मुले लहान होती तरी सुद्धा आमच्या बरोबर पंचपदीला बसत दोन चार जण असे पंचपदीला असु त्या वेळी अभंगाला साध्या टाळांची नंतर झांज आली त्या नंतर पेटी आली काही वेळेला तबल्याची साथ मिळत असे त्या मुळे श्री महाराजांनी लावलेल्या अभंगाला त्या सांप्रदायीक चाली असत. मी दर गुरूवारी नवीन अभंग म्हणायचा प्रयत्न करीत असे श्री महाराजांच्या प्रोत्साहना मुळे बऱ्याच वेळा गुरूवारी महामंडळातुन अभंग म्हणण्याची संधी प्राप्त झाली. **(क्रमशः)**

# ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



## अक्षर खेळ

**मी साधा माणूस। खेळतो अक्षरे।
जनांसी आवडे। माझे खेळ ॥१॥
कर्ता करविता। असे तो ईश्वर।
मी एक पामर। इहलोकी ॥ २॥
लोभ मजवरी। असाच असू द्या।
सकळा मिळू द्या। सुख शांती ॥३॥
माधव हा म्हणे। नांदो सुख शांती।
सकल जगती। सदोदित ॥४॥**



# आरोग्य संजीवनी

## दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

खुप काम आहे, असे म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकते. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकता तसेच कार्यक्षमतेवर देखील वाईट परिणाम होऊ शकतो काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळात पण आरोग्यासाठी हे घातक आहे. हे आहेत दुष्परिणाम.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

चक्कर येणे.

भुकेले राहिल्याने अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

ताण-तणाव.

भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

लठ्ठपणा वाढतो.

भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केल्यास, वेळी-अवेळी खाल्लास, वजन वाढते, म्हणजे लठ्ठपणा वाढतो... वेळेत जेवण न केल्याने चयापचय प्रक्रिया बिघडते व फॅट्स शरीरात जमा होतात, यामुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. तेव्हा वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तरं, भूक लागेल तेव्हा वेळेवर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि किमान २० मिनिटे व्यायाम करा...

मेंदूचे कार्य बिघडते.

ग्लुकोजच्या मदतीने मेंदूचे कार्य सुरू असते. यासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी खालावते. लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता कमी होते.

चिडचिड.

भुकेमुळे जास्त चिडचिड होते. रक्तातील साखरेची पातळी खालावल्याने मेंदूप्रमाणे तुमच्या मूडवर याचा परिणाम होतो...

***



# लघु बोधकथा

**◆ मोबाईल - चांगला आणि वाईट**

*सुरेखाला आवडत होती पुस्तक. ती त्यातील गीतं वाचत होती. मात्र नरेश तिला हसायचा. त्याला वाटायचं की अलिकडील काळात मोबाईल बरा की तो एका क्लिकवर गोष्ट शोधून देवू शकतो. नरेशचं बरोबर होतं. कारण काळ बदलला होता. मोबाईलला जास्त महत्व आले होते. एकदा नरेशचा मोबाईलमुळं अपघात झाला. ज्यात डॉक्टरांनी सांगीतलं, "सतत मोबाईल चालवायचा नाही. वेडा होशील. हं, पुस्तक वाचू शकतोस." आता त्याच्या सोबतीला पुस्तक होती. कारण तो मोबाईल चालवू शकत नव्हता.*

*बोध-
कोणत्याही गोष्टीला चिल्लर समजू नये.*

# एआयचा नवसूर्य आणि भारताची गरुड झेप

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

तीन टप्प्यावर परिवर्तन

लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसंख्येच्या प्रमाणात कृत्रिम प्रज्ञाची उपलब्धी कौशल्य विकास आणि विस्तार तसेच सार्वभौम तंत्र निपूनतेची जडणघडण यामुळे राष्ट्रीय स्तरावर क्रांतिकारक बदल घडतील. नवन्मेष आणि प्रयोगशील प्रतिभेला चालना देण्यासाठी एका व्यापक परिसंस्थेच्या विकासाला त्यामुळे नवी दृष्टी लाभेल. तंत्र सुसंगत कार्य संस्कृती विकसित होईल. व नवीन विक्रम स्थापित करणे शक्य होईल.

मायक्रोसॉफ्टच्या या नवीन भागीदारीमुळे एआय क्षेत्रात भारतामध्ये तीन टप्प्यावर संभाव्य परिवर्तन शक्य होणार आहे. त्यापैकी पहिला टप्पा हा उच्च पातळीवरील पायाभूत सुविधांच्या विकासावर आधारलेला आहे, दुसरा विश्वास वृद्धीवर भर देणारा आहे, परस्पर विश्वास तसेच सार्वभौम निर्णय क्षमता सुनियोजित कौशल्य कार्यक्रम आणि ए आय तंत्रज्ञान भारताच्या विकास सहभागाला बळकटी देणारे जसे आहे तसेच ते भविष्यात आत्मविश्वासाने वाटचाल करण्यासाठी संप्रेरक म्हणून नवे चैतन्यदायी सामर्थ्य देणारे ठरणार आहे. तिसरा टप्पा हा कौशल्य वृद्धीवर भर देणारा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी उपयुक्त ठरेल त्यामुळे भारत भविष्यकाळात सक्रिय शाश्वत विकास चक्रांना गती देऊ शकेल. व्यापक पायाभूत सुविधा सार्वजनिक पातळीवर विकसित होतील आणि अशा सुविधामुळे नवी झेप घेताना अद्वितीय कामगिरी करणे शक्य होईल.

मायक्रोसॉफ्टची ही गुंतवणूक मोहीम भारतामध्ये कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रात एक नवा टप्पा गाठण्यासाठी हितकर ठरेल आणि ए आय व्यासपीठावरून शेती उद्योग शिक्षण आरोग्य सामाजिक सुरक्षा या क्षेत्रात नवी कामगिरी सक्रियपणे करणे शक्य होईल. त्यानुसार भारतातील प्रमुख आयटी नगरे बंगळुरू, भागानगर (हैदराबाद) पुणे, गुरुग्राम ( गुडगाव ) नोएडा (इंद्रप्रस्थ नगरी ) आणि इतर शहरात २२००० हून अधिक कर्मचाऱ्यांचे सबलीकरण करण्यासाठी फलदायी ठरेल. त्यामुळे नमुनेदार विकासापासून ते पुढील काळात उत्पादन अभियांत्रिकी नवोपक्रमापर्यंत सर्व प्रक्रियांना गती देण्यासाठी हे प्रयत्न कारणी लागतील अशी अपेक्षा आहे.

मायक्रोसॉफ्टच्या या सर्व योजनांचा आत्मा काय असेल तर गलित गात्र व्यवस्थित चैतन्य आणणे हा आहे त्यानुसार त्यांनी भारतामध्ये ए आयचा प्रसार समाजाच्या सर्व स्तरावर सर्व गटांमध्ये आणि सर्व प्रदेशांमध्ये करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे भारतात भारतात ए आयचा अवलंब सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे शक्य होईल भागानगर येथील साउथ सेंट्रल क्लाऊड रीजनमध्ये होत असलेली महत्त्वपूर्ण प्रगती अधिक गतिमान करण्याचा हा प्रयत्न आहे. त्या प्रयत्नामध्ये सुसूत्रता आणण्याचा हा संकल्प आहे



पुढे चालून मायक्रोसॉफ्ट आपल्या पुणे, भागानगर तसेच चेन्नई या ठिकाणी असलेल्या डेटा सेंटर केंद्रांचा विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या विस्तारामुळे भारतात काम करणाऱ्या या संस्थांना अधिकचे पर्याय उपलब्ध होतील तसेच उद्योग स्टार्टअप आणि सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादक संस्था यांनाही लाभ होईल




कुशल प्रतिभेचे सक्षमीकरण

मेधावी नोवन्मेष प्रतिभा हा भारताच्या विज्ञान तंत्रज्ञान क्रांतीचा आत्मा आहे. हे लक्षात घेऊन भारताच्या कुशल कुशाग्र विज्ञान प्रतिभेचे सक्षमीकरण करण्यावर मायक्रोसॉफ्टने भर दिला आहे.

मायक्रोसॉफ्टच्या भारतामधील ग्राहकासाठी ही एक नवी फलदायी योजना आहे. त्यानुसार अनेक नवी क्षेत्रे पादाकांत करणे शक्य होईल मेधावी प्रतिभेचे वैज्ञानिक नव्या क्षितिजावर दमदार वाटचाल करू शकतील आणि आपल्या शोधामुळे राष्ट्रीय विकासाला नवी गतीलाभेल. अशा प्रयत्नांचा आणखी एक बिंदू म्हणजे सार्वभौम सार्वजनिक कवच आता भारतामध्ये उपलब्ध होईल ते वापरून नवीन कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला नियंत्रणे लागू करताना एक पूर्व लेखीत स्थापत्याचा उपयोग करता येईल. यामुळे मायक्रोसॉफ्टच्या भारतातील सर्व प्रदेशातून सर्वदूर, सखोल पसरलेल्या लोकांसाठी एआय वापर सुलभपणे करता येईल. कुठे जोडणी करता येईल कुठे तोडणी करावी लागेल याबाबतची नियंत्रणे सुद्धा त्यामुळे सुनीयोजित व सुरक्षितपणे आखता येऊ शकतील.

लोकप्रशासनाचे साधन

ए आय हे केवळ चकवा देणारे तंत्रज्ञान नाही तर त्याचा उपयोग भविष्यात भारतासाठी सामाजिक सुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीसाठी होईल कल्याणकारी योजनांच्या लोकाभिमुख योगदानासाठी मायक्रोसॉफ्ट चे हे प्रशिक्षण एका वचनबद्धतीकडे घेऊन जाणारे आहे शिवाय एनसीएस पोर्टलवर सेवा योजना नोकरी प्रदान करण्यासाठी काम करेल ग्राहकांना त्यांच्या व्यापक कल्याणासाठी परिसंस्थांना प्रोत्साहित करताना मायक्रोसॉफ्टचा हा पुढाकार भारताच्या कल्याणकारी संविधान संस्कृतीस बळकटी देणार आहे मायक्रोसॉफ्टचे आजवरचे भारताबरोबरचे संबंध अधिक मजबूत करण्यासाठी आणि समावेशक शाश्वत विकासाला संपूर्ण गती देण्यासाठी त्याचा फायदा होईल हे सर्व उपक्रम मायक्रोसॉफ्ट च्या सखोल वचनबद्धता प्रतिबिंबित करणारे आहेत. मायक्रोसॉफ्ट इंडिया आणि दक्षिण आशियाचे अध्यक्ष पुनित चंडोक यांच्या मते मायक्रोसॉफ्ट गेल्या तीन दशकांपासून अधिक काळपर्यंत भारताच्या पायाभूत संरचनेचा भाग बनला आहे तसेच देश आत्मविश्वासाने त्याच्या प्रथम या धोरणासह उज्वल भविष्यकाळाकडे वाटचाल करीत आहे अशा प्रसंगी अब्जावधी लोकांच्या सोनेरी स्वप्नांना बळकटी देण्यासाठी या पायाभूत सुविधा ९० आणि रोजगार संधींना पुढे नेण्यासाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभा राहत आहे याचा अभिमान वाटण्यासारखी घटना आहे जानेवारी २०२५ मध्ये घोषित झालेल्या तीन अब्ज अमेरिकन गुंतवणुकीवर आधारित ही नवी १७.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक नवी वचनबद्धता आणि तंत्रज्ञान परिसंस्थेतील सखोल भागीदारीचे एक नवे प्रतीक बनले आहे. भारताची नवी ए आय महत्त्वकांक्षा देशातील प्रत्येक नागरिकांसाठी अधिक परिणामकारक आणि उपयोजित बनविण्यावर नरेंद्र मोदी भर देत आहेत अशा वेळी हे गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर स्केल पायाभूत सुविधा निर्माण करेल. प्रगाढ विश्वासामुळे तो निश्चित सार्वभौम कवच तयार करणे शक्य होईल. कौशल्य कार्यक्रम प्रत्येक भारतीयास अभिमान वाटावे असे नाही तर भविष्यात विकासात सामील होण्यासाठी त्याच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी सक्षम करत आहेत हे सूत्र घेऊन आपण नवीन गुंतवणुकीकडे पाहिले पाहिजे. याचा अर्थ असा होतो की सुरक्षा कवच पायाभूत सुविधा कौशल्य विकास उपक्रम हे संपूर्ण भारतातील कृती कार्यक्रमांचा परीघ वाढवणारे ठरतील. सहा मोठ्या नगरासहित सर्व दूर शहरी व ग्रामीण भागात पर्यंत ए आय तंत्रज्ञानाचा विस्तार होईल व औद्योगिक विकासाला चालना मिळेल भारतातील ए आय क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. १४२ कोटी लोकसंख्येच्या प्रमाणात ए आय तंत्राचा अधिक विस्तार केल्यामुळे अधिक कामगारांना या प्रशिक्षणाचा फायदा होईल

हे तंत्रज्ञानाचे सामाजिकरण होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीस सोनेरी पंख देण्याचे काम मायक्रोसॉफ्टने केले आहे.

समारोप

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की रोजगार निर्मिती कल्याणकारी योजनांची आखणी व अंमलबजावणी आणि सामाजिक सुरक्षेचे कवच तसेच सामाजिक व आर्थिक न्यायाची हमी या संविधान संस्कृतीची परिपूर्ती करण्यासाठी ए आय चा वापर वचनबद्धतेकडे घेऊन जाईल.

मायक्रोसॉफ्टची भारतामधील १७.५ बिलियन डॉलर्सची गुंतवणूक ही त्यामुळे क्रांतिदर्शी आहे. व एका नव्या दिशेने वाटचाल करणारी आहे, आणि भविष्यकाळात भारताच्या मेधावी प्रतिभेला नव्या दिशा देणारी आहे. पहिल्या एआय परिषदेत लंडन येथे बोलताना इंग्लंडचे माजी पंतप्रधान ऋषी सूनक यांनी भारतातील विज्ञान तंत्रज्ञान, गणित आणि इंग्रजी भाषा शिक्षणामुळे या क्षेत्रात भारत दमदारपणे पुढे जाऊ शकतो असे सूत्र मांडले होते. दुसऱ्या जागतिक ए आय परिषदेत फ्रान्समध्ये पॅरिस येथे झालेल्या विचार मंथनात भारताने सक्रियपणे भाग घेतला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी या परिषदेचे सहअध्यक्ष होते. आता तिसरी परिषद भारतामध्ये इंद्रप्रस्थ नगरीत संपन्न होणार आहे. त्या अगोदर मायक्रोसॉफ्ट विचार मंथनात भारताने सक्रियपणे भाग घेतला होता. मायक्रोसॉफ्ट समूहाने टाकलेले हे दमदार पाऊल प्रगतीच्या नव्या दिशा उजळणारे आणि नव्या क्षेत्रात भारताच्या आशा आकांक्षा अधिक पल्लवीत करणारे आहे. पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी भारताच्या भावी एआय प्रगतीचा जो रोड मॅप दिला आहे तो पाहता निश्चितच भारताची ही घोडदौड प्रेरक आहे. स्फूर्तीदायक आहे २०३० पर्यंत भारत जगाची ए आय राजधानी होईल यात शंका नाही. किंबहुना मायक्रोसॉफ्टच्या सबळ पाठिंबामुळे भारताचा हा आत्मविश्वास अधिक वाढला आहे अलीकडे जागतिक पातळीवर इंटेल सारख्या संस्था सेमी कंडक्टर क्षेत्रात सुद्धा भारताला मदत करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. गुगल आणि ॲमेझॉन हे भारतात ६५ बिलियन डॉलरची गुंतवणूक करत आहेत, त्यामुळे नव्या रोजगार संधी उपलब्ध होतील. जागतिक संस्था आणि प्रतिष्ठित कंपन्यांना भारतीय प्रतिभेविषयी वाटणाऱ्या आत्मविश्वासाचे हे एक प्रभावी प्रतीक आहे. किंबहुना असे म्हणता येईल की मायक्रोसॉफ्टने घेतलेला हा धाडसी निर्णय भविष्यात किती महत्त्वाचा आहे याची त्यांना खात्री असल्यामुळेच त्यांनी एवढे गुंतवणूक भारतामध्ये करून भारताच्या क्षमतांना जणू विकास आणि प्रगतीची नवी पावती दिली आहे यात शंका नाही.

लोकसंख्येच्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास व विस्तार करणे अगत्याचे होते. त्याशिवाय एआयचे लोकशाहीकरण शक्य नव्हते, जगात प्रथमच कृत्रिम प्रज्ञाला मानवी विकासाचा चेहरा भारत देत आहे. नव्या राष्ट्रीय व्यासपीठांमध्ये एआयचा समावेश करून आणि कल्याणकारी कार्यक्रमांची आखणी व परीघ वाढवून भारत नव्या युगात जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. शल्य प्रगत तंत्र कौशल्य आणि सार्वभौमत्व कवचाच्या बळावर भारत २०३० पर्यंत नवीन गरुड झेप घेण्यासाठी सुसज्ज झाला आहे. त्यामुळे ९ डिसेंबर हा दिवस अजी सोनियाचा दिनु, बरसे अमृताचा घनु असेच या पवित्र दिवसाचे वर्णन करता येईल.




## गुरु वायूर येथील श्रीकृष्ण मंदिर

**ज्योतिर्मय साहित्य**

विल्व मंगल स्वामीयर कृष्णन* हे थोर दिव्यदृष्टी असलेले श्रेष्ठ संत होते. ते देशभरात अनेक कृष्ण मंदिरात गेले, आणि प्रत्येक ठिकाणी त्यांना बाळकृष्णाचा अनुभव यायचा. गुरुवायूर मंदिरात हे रोज साधनेसाठी जात. त्यांना तिथे एक छोटासा सावळा मुलगा त्यांच्याशी खेळायला येत असे. तेही त्या निरागस आणि गोड मुलाशी खेळत. या बालकाने एके दिवशी खेळता खेळता पूजा साहित्याची नासधूस केली. रागाने स्वामीयरांनी त्याला धक्का देऊन हाकलून दिले.यामुळे ते बालक खाली कोसळले व ते बालक रडत रडत तिथून निघून गेले. पाहता पाहता ते अदृश्यही झाले. ज्या क्षणी असे घडले त्या क्षणी संतांना जाणीव झाली की, हे मूल साधारण कोणी नव्हते तर ते प्रत्यक्ष परमात्मा बाळकृष्ण बालक रूपात अवतरले होते. त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली. ते वारंवार भगवंताला क्षमा याचना करू लागले. संत गाभाऱ्यात गेले. त्यांना आलेली शंका खरीच ठरली. जेव्हा त्यांनी बालकास धक्का देऊन खाली पाडले, तेव्हा त्याच्या कपाळावर खरचटले होते. तसाच खरचटल्याचा व्रण इथे मुख्य विग्रहाच्या कपाळावर दिसत होता. आता पुन्थानम यांना अपराधीपणाची बोच वाटू लागली. आपल्या हातून भयंकर मोठे पाप घडले या जाणिवेने ते भगवंताची वारंवार क्षमा मागू लागले. ते धाय मोकलून रडू लागले.



संतांना आलेले दिव्य अनुभव इथे मुद्दाम होऊन नमूद करण्याचे कारण असे की, या भौतिक सुखलोलूप जगात, आपल्या श्रद्धा कमकुवत होऊ शकतात. आपणास मंदिरातील विग्रह ही केवळ प्रतिमा आहे, हा भावच दृढ व्हायला लागतो. संतांच्या अनुभवातून आपली श्रद्धा बळकट व्हावी व या संतांनी केलेल्या साधनेचे अनुसरण आपल्याही हातून घडावे म्हणून इथे या घटना नमूद केल्या आहेत.

अन्नदान– गुरुवायूर येथे अन्नदानाचे विशेष महत्त्व आहे. भक्त स्वतःची तुला, साखर, गहू ,तांदूळ, केळी, तुळस इत्यादींनी करून ते पदार्थ इथे दान करतात.जास्तीत जास्त अन्नदान आपल्या हातून घडावे, हाही भाव येथे असतो. मंदिरा तर्फे सर्वांना रोज प्रसाद दिल्या जातो.

विद्यारंभ– मुलांचा विद्यारंभ करण्यापूर्वी येथे येऊन भगवंताच्या साक्षीने हा विधी केल्या जातो.

दिपोत्सव – गर्भ गृहामध्ये कोठेही विजेचे दिवे लावलेले नसतात. सर्वत्र पणत्यांची आरास केली जाते. दररोज संध्याकाळी अशा हजारो पणत्यांनी परिसर सुशोभीत केल्या जातो.

भगवान श्रीकृष्णाच्या चरण कमलावर आपण मनोमन कोटी कोटी वंदन करून हा भाग इथेच संपवूयात. हाथी घोडा पालखी जय कन्हैया लाल की ***

# आज फिर जीने की तमन्ना है

**ज्योतिर्मय साहित्य**

''आज फिर जीने की तमन्ना हैं, आज फिर मरने का इरादा हैं.'' बाल्कनीतल्या झोपाळ्यावर बसून पावसाला बघत कॉफी पिताना ती गुणगुणत होती. चाळीशी गाठली होती तिने गेल्याच आठवड्यात; पण तसं कोणतंच लक्षण तिच्या अंगभर कुठेही दिसत नव्हतं.

तारूण्याची किनार अजून मोह घालत राहिली.. गालावरती बट रूंजी घालत होती.. मृगजळात अडकलेलं मन.. धावू लागलं वाऱ्या सोबत.. नृत्याची आवड असणारी ती पुन्हा एकदा वळली.. पाऊल थिरकले.. हवेतच हाताच्या नजाकतीने ताल धरला.. नृत्य हेच आत्मसुख मानणारी काळाच्या ओघात लुप्त झालेली ती..

पुन्हा पावसात भिजून चिंब..

ओठांवर गाणे तिच्या नकळत आले ''आज फिर जीने की तमन्ना है'' मनाने हळूच डोकावून पाहिले तीचे चाळीशीतले तारूण्य उजळून निघाले होते.

शांभवी तेरा वर्षांची असेल तेव्हा तिला शेजारच्या काकू सारखं म्हणायच्या ''फारच सुंदर नाचतेस तू.. तुला तर एखाद्या नृत्य वर्गात पाठवायला हवं''. पण शांभवीचे आई वडील संस्कृती जपणारे, जुन्या गोष्टी पाळणारे, शिवाय तिच्या आजीला असलं काही खपायच नाही. मग काय करणार शांभवी लपून छपून शेजारच्या मैत्रीण बरोबर कधी कधी नृत्य शिकायची. कधी कधी नृत्य कार्यक्रम पहायला जायची.. पण मन मात्र तिला शांत बसू द्यायचं नाही.पुढे अभ्यास करून स्वतःच्या पायावर उभे राहून मग या कलेला वेळ द्यावा असं तिला वाटू लागलं.. शांभवी तशी हुशार होती तिला तिच्या महत्वकांक्षी



स्वभावाने आयुष्यात यश मिळाले.

ती आता मोठ्या हुद्द्यावर काम करू लागली. आई वडील ही समाधानी झाले आता तिच्या लग्नाची चिंता त्यांना सतावू लागली. स्थळसुद्धा तोला मोलाचं हवं म्हणून सगळीकडे वर संशोधन सुरू झालं.. शांभवीला मात्र यातील काही कल्पना नव्हती आणि अचानक एक दिवस घरी आल्यावर आईने तिला सांगितले ''आपल्या पाहुण्यातील एक स्थळ आले आहे. तू उद्या सुट्टी घेतली तर बरे होईल. ''शांभवीने


सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

जास्त विचार केला नाही.. ती फक्त ''ठिक आहे'' असं सांगून निघून गेली. स्थळ चांगले होते '' सुजय हा मोठा वकील होता त्याचे

बाबा, काका सारेच राजकारणात होते. पिढ्यानपिढ्या त्यांचे घराणे राजकीय असल्याने घरात सुबत्ता, आणि गावात मक्तेदारी होती. शांभवीच्या आई वडीलांना हे स्थळ जुळून यावे हे मनोमन वाटत होते.

शांभवी सकाळी आवरून बसली होती तोवरच तिकडचे लोक बघण्यासाठी आले. सुजय समोर बसला होता शांभवी जेव्हा बाहेर आली तेव्हा त्यांची नजरानजर झाली. सुयश दिसायला देखणा, रूबाबदार होता आणि शांभवी देखील साधी सुंदर पण बोलके डोळे, लांबसडक केस, पाहताक्षणी लक्ष वेधून घेणारी होती. थोडी बोलणी झाली बघण्याचा कार्यक्रम झाला आणि नंतर दोन दिवसांत तिकडून निरोप आला.. आईने शांभवीला दुपारी फोन करून कळवले.

शांभवी देखील मनापासून आनंदी होती. दोन्ही कडून होकार मिळताच लवकरच साखरपुडा करण्यात आला.


नवीन स्वप्नं, नवे लोक ह्यामध्ये शांभवी रमू लागली. सुजय सोबतही हळूहळू बोलणं वाढू लागलं एकमेकांना काय आवडतं ते पाहून एकमेकांची काळजी ते घेऊ लागले. लग्न मोठ्या थाटामाटात साजरे झाले. पै पाहुणे, आप्तेष्ट मित्रपरिवार सगळे उपस्थित होते.

**(क्रमशः)**












# ॥ अमृततुल्य-प्रेमाचा चहा.॥

ज्योतिर्मय साहित्य

चहा हे तर आपल्याला अतिशय प्रिय,आणि लोकप्रिय पेय आहे. इतर अनेक पेय आहेत, पण त्यामानाने हे स्वस्त आणि मस्त पेय आहे. चहात कधी आले तर कधी विलायची टाकून चहा बनवला जातो. तसेच गवती चहा मिळतो तो टाकूनही चहाची लज्जत वाढते. चहा कोणत्या सिझन मध्ये आणि कुठे आणि कोणा सोबत घेतो हेसुद्धा महत्त्वाचे आहे. चहा मोठ्या हॉटेलमध्ये मिळतो आणि रस्त्यावरच्या चहाच्या टपरीवरही मिळतो. पण रस्त्याच्या कडेला उभे राहून आणि त्यातही ग्लास मध्ये वाफाळलेला चहा, चहाचे टपरीवर घेण्याची मजा काही औरच असते. प्रत्येक ठिकाणचा आनंद वेगवेगळा असतो.

आपण चहा कशाबरोबर घेत आहे हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे असते. अर्थात प्रत्येकाचे आवडीनुसार त्या त्या वेळी त्या त्या सीझनमध्ये ते घेण्याची मजा असते. कधी गरम-गरम बटाटावडा-मिरची,कधी कधी मिरची- बटाटा भजे, या सोबत घेतलेला चहा, तर दिवाळीच्या दिवसात चकली बरोबर घेतलेला चहा. आणि रोज आपली सकाळ होते ती चहा पिऊनच. तेव्हा रोज कधी खारी बिस्कीट, गोड बिस्किट, खारी, पाव,वेफर्स या सोबत घेतलेला चहा.

निरनिराळ्या गावी जातो तिथेही आपली चहाची विशिष्ट ठिकाण असतात, त्याच ठिकाणी चहा घेत असतो.. पुण्यात बालगंधर्व चौकात,कोल्हापूरच्या महाद्वार रोडवर ताज्या दुधाचा घोटीव चहा, नासिकला एम. जी रोडवर,मिरजेच्या स्टेशन रोडवर,जळगांव, भुसावळ, जामनेर, दादर,मुंबई, डोंबिवली, असे निरनिराळ्या शहरात आपण जातो त्या ठिकाणी चहा घेण्याची एक वेगळीच मजा असते. क्वचित प्रसंगी आपण आवडीने त्या ठिकाणी दोन दोन वेळा चहा घेतो. तो चहावालाही आपली आवड लक्षात घेता आनंदाने आपल्याला जसा हवा तसा चहा करून देतो आणि परत या आमंत्रण देतो. अशी अनेक ठिकाणे आपण त्यासाठी आपल्या मनात ठेवलेले असतात.मसूरीला थंडीत मसुरी की झीलला चहा घेण्याची मजा काही औरच. नाही का ?

भारतातील प्रत्येक कोपऱ्यात चहाचे वेगवेगळे प्रकार अनुभवायला मिळतात. प्रत्येक प्रांताचा चहा बनवण्याचा स्वतःचा खास पद्धत असतो. उत्तर भारतात मसाला चहा, पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंगचा सुवासिक चहा, दक्षिणेत फिल्टर चहा, तर महाराष्ट्रात कडक ‘कटिंग चहा’ प्रसिद्ध आहे. चहा हा केवळ एक पेय नाही, तर मित्र-मैत्रिणींच्या गप्पांचा, चर्चा आणि विचारमंथनाचा अविभाज्य भाग आहे.

चहाला अनेक नावाने संबोधले जाते कधी त्याला ‘‘कडक मीठा‘‘ म्हणतात, तर कधी ‘‘पंजाबी तर कधी गुलाबी तर कुठे त्याला ‘‘अमृततुल्य‘‘ असेही म्हणतात. चार मित्र एकत्र जमले की त्यांना थोड्यावेळात चहा पिण्याची लहर आली नाही तर नवलच. चला...



चार कट...पाच कट...अशी ऑर्डर. लग्नसमारंभात सुध्दा गप्पा करता करता चहाचा कप हातात असतोच.

जगभरात दरवर्षी १५ डिसेंबर हा दिवस ‘‘आंतरराष्ट्रीय चहा दिवस‘‘ म्हणून साजरा केला जातो. अनेक देशात चहाचे उत्पादन आणि वितरण विक्री हे अनेक कुटुंबाचे परिवारासाठी जगण्याचं मुख्य साधन तर आहेच, पण देशासाठी उत्पन्नाचा मोठा स्त्रोत आहे. आणि या चहाच्या उद्योगाच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. चहा हे नगदी पीक आहे. आपल्या दैनंदिन जीवनात चहाचे महत्त्व आहेच. तसेच चहाचा व्यापार आणि चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या लाखो कामगारांकडे लक्षवेधी आहे हा चहा दिवस साजरा केला जातो. अर्थातच चहाच्या व्यापाराला प्रोत्साहन देऊन या उत्पादनाकडे सगळ्यांचं लक्ष वेधणे हा हेतू असतोच. भारत, केनिया, व्हियेतनाम, युगांडा, मलेशिया, इंडोनेशिया, चीन, श्रीलंका, या देशात चहाचे उत्पादन घेतले जाते. आंतरराष्ट्रीय संघटनेच्या बैठकीत १५ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून साजरा करावा हा निर्णय झाला, आणि त्यानंतर २००५ सालापासून १५ डिसेंबरला आंतरराष्ट्रीय चहा दिवस साजरा होऊ लागला. डिसेंबर महिना हा थंडीचा महिना आहे. आणि त्यादृष्टीने चहा हे महत्त्वाचे पेय आहे. त्याला पुढे आल्यानंतर कोणी नाही म्हणत नाही. अर्धा अर्धा कप जरी म्हटला तरी दिवसभरात ५/७ वेळी होतोच, आणि या चहा चा मोह थंडीच्या दिवसात आवरला जात नाही. त्यादृष्टीने डिसेंबर महिना हा महत्वाचा आहे.

भारताने २०१५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या फूड अँन्ड अग्रिकल्चर ऑर्गनायझेशनला आंतरराष्ट्रीय चहा दिवसाची व्याप्ती वाढवायचा प्रस्ताव दिला. त्यानुसार संयुक्त राष्ट्र संघटनेने यावर अनेक देशांचा विचार घेऊन २१ मे जागतिक चहा दिवस साजरा करावा असा निर्णय घेतला.

चहा जगातील सर्वाधिक सेवन केल्या जाण्याऱ्या पेया पैकी एक आहे. त्यामुळेच प्रत्येकाची चहा बनवण्याची पध्दत वेगळी असते. कुणाला आलं घालून चहा प्यायला आवडतं तर कुणाला ब्लॅक टी प्यायला आवडतो. जगात चहाची शेती सर्वप्रथम चीनमध्ये करण्यात आली होती.

म्यानमार आणि आसामच्या पर्वतीय भागात १८२४ सालच्या




दरम्यान चहाचे पानं सापडली. त्यानंतर इंग्रजांनी १८३६ सालापासून चहाचे उत्पादन सुरु केलं. सुरुवातीला यासाठी चीनमधून चहाचे बी मागवले जात होते

त्यानंतर आसामच्या भागातील चहाच्या बियांचा वापर सुरु झाला. भारतातील चहाचे उत्पादन हे ब्रिटनमधील चहाची मागणी पूर्ण करण्यासाठी केलं जायचं. आज चहा हे भारतात सर्वात स्वस्त आणि लोकप्रिय पेय आहे. आसामचा चहा सर्व जगभर आसाम टी म्हणून प्रसिध्द आहे.

चीन हा जगातील सर्वात मोठा चहाचा निर्यातक देश आहे भारतातही चहाचं मोठ्या प्रमाणात उत्पादन होतं पण स्थानिक स्तरावर त्याचं सेवनही मोठ्या प्रमाणात केलं जातं. टी बोर्ड ऑफ इंडियाच्या मते, भारतातील चहाच्या एकूण उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन हे भारतातच सेवन केलं जातं

चहाचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. चहा आपल्याला उर्जा देतो, शरीरातील ताजेतवानेपणा वाढवतो आणि काही प्रकारचे चहा जसे की ग्रीन टी, पुदिना टी इत्यादींचे नियमित सेवन केल्यास शरीरातील विषारी घटकांचे प्रमाण कमी होते. चहामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

चहामध्ये प्रोटिन, पॉलीसॅकेराइड, पॉलिफेनॉल, मिनरल्स आणि अमिनो, कार्बनिक ॲसिड, लिग्निन आणि मिथाइलक्सैन्थिन (कॅफिन, थिओफिलाइन आणि थियोब्रोमाइन) हे घटक असतात. हे शरीराला फायदेशीर असतात. चहामध्ये फायटोकेमिकल्स असतात जे आपल्या शरीरात शक्तिशाली ऑंटी एक्सीडेंट म्हणून कार्य करतात.


शहरी भागात अनेक ठिकाणे ‘‘प्रेमाचा चहा‘‘ ‘‘ या चहा घ्यायला‘‘ चहा घेताय ना‘‘... ‘‘अमृततुल्य‘‘... ‘‘चहा डॉट कॉम‘‘-- अशा अनेक नावांनी चहाची दुकान सजलेली असतात.. त्याबरोबर कुठे गरम गरम भजी, वडा, असे असते. ऐन पावसाळ्यात चहाच्या टपरी वर जाऊन चहा.. भजी खाण्यात काय वेगळीच मजा असते तर कधी शहरात जुनी इराणी हॉटेल सारखी हॉटेल आहे तेथे बसून चहाचा घोट घेत घेत बाहेरच्या पावसाची मजा पाहणे ही वेगळी मजा आहे. चहा हे पेय आहे की एकमेकात जवळीक निर्माण करते. आपण सहज कोणालाही घरी बोलावतो, त्याला म्हणतो या चहाला. अगदी कुठलाही कार्यक्रम असो चहा घेतल्याशिवाय सुरवत होत नाही. लग्न ठरवताना सुद्धा चहा पोहे असाच कार्यक्रम असतो.आपण गाणे ऐकतो,शायद मेरे शादी का खयाल दिल मे आया है... आणि मम्मीने तुम्हे चाय पे बुलाया है... येथे चहा आलाच.श्रीमंत असो वा गरिब... त्यात मात्र भेदभाव नाही.

आपल्या राज्यात मंत्रीमंडळाचे अधिवेशन होतात, तेव्हाही आदल्या दिवशी चहापानाचा कार्यक्रम हा असतोच. असे हे एकमेव पेय..... चला तर मग चहा घेऊन साजरा करुया हा दिवस. चला चहा घेताय नां.... घ्यायलाच पाहिजे...!!!


# प्रत्यक्ष साक्षात्काराचा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेचे, प्रचितीचे अनेक अनुभव मला अनेकवेळा आलेले आहेत. त्यापैकी एक अनुभव मी सांगतो. लातूर येथे मी नगर रचनाकार कार्यालयात शासकीय नोकरीत कार्यरत असताना कार्यालयाची पोस्टाच्या आर.डी.ची व पी.पी.एफ.ची रक्कम बचतीची पुस्तके दरमहा पोष्टात जमा करीत असे. सन २००५ साली ऑक्टोबर महिन्यात नेहमीप्रमाणे मी आरडीची व पीपीएफची पुस्तके लातूरच्या पोष्ट कार्यालयात जमा केली व पोचपावती घेऊन मी कार्यालयात आलो. तदनंतर, दोन दिवसांनी मी रक्कम जमा झालेली आरडी व पीपीएफची पुस्तके परत आणण्यासाठी पोष्टात गेलो व पुस्तकांचा गठ्ठा घेवून कार्यालयात आलो. ते कपाटात ठेवून काम करु लागलो. दूसऱ्या दिवशी कपाट उघडून मी पुस्तके तपासली असता मला पीपीएफच्या पुस्तकांचा गठ्ठा दिसला नाही. म्हणून, मी पोष्टाच्या कर्मचारी महिलेला म्हणालो, बाई तुम्ही मला आरडी पुस्तकांचा गठ्ठा दिला परंतु, पीपीएफच्या पुस्तकांचा गठ्ठा दिला नाही. तेव्हा, त्या म्हणाल्या, ओ साहेब सर्व दोन्ही गठ्ठे तुम्ही त्यादिवशीच माझ्याकडून घेवून गेला आहात.



आता माझ्याकडे तुमची पुस्तकं नाहीत. बाहेरच कूठे ठेवली आहेत का बघा. असं त्यांनी सांगितल्यावर मी घरी येवून घरच्या कपाटात सर्वत्र शोध घेतला. परंतू, कूठेही पीपीएफच्या पुस्तकांचा गठ्ठा मिळाला नाही, दरम्यानच्या कालावधीत माझा श्री स्वामी समर्थांच्या नामस्मरणाचा धावा चालूच होता. दुसऱ्या दिवशी मी कार्यालयातही शोध घेतला पण, तिथेही पुस्तके मिळाली नाहीत. तेव्हा, मी खूप चिंतेत होतो. कारण त्या पुस्तकांमध्ये जवळपास १५ कर्मचाऱ्यांची २२ ते२५ लाख रुपयांची रक्कम जमा होती. पासबुकाविना ती रक्कम त्यांना मिळणं अशक्य होतं. पण! अशक्य ते शक्य करतील स्वामी! ही प्रचिती मला आली. पासबुक मिळाले का हे बाईंना विचारण्यासाठी मी पून्हा पोष्टात गेलो, पासबुक मिळाले आहेत का म्हणून त्यांना विचारले. तेव्हा, त्यांनी सांगितले की, जरा काळजीपुर्वक काम करत जा. तुमच्या पीपीएफच्या पुस्तकांचा गठ्ठा तळमजल्यावरील साहेबांकडे आहे. तिथे विचारा. तेव्हा हे ऐकून माझ्या जीवात जीव आला. कारण त्या पीपीएफच्या पुस्तकांमध्ये कार्यालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांची २२ ते २५ लाख रुपयांची रक्कम त्यात होती. मुख्य म्हणजे कर्मचाऱ्यांची बदली झाली की, बदलीच्या गावातील पोष्ट कार्यालयात पासबुकांमध्ये रक्कमेची नोंद होत असते. त्यामुळे, कर्मचाऱ्यांना रक्कमही देणे अशक्य होते. आणि मला त्याबाबत नोकरीत शिक्षाही मिळाली असती. पण, ही अशक्य कोटीतील गोष्ट श्री स्वामी समर्थ महाराजांनी शक्य करुन दाखविली. ‘‘अशक्यही शक्य करतील स्वामी ‘‘ अशी श्री स्वामी समर्थांची ईश्वरी लिला आहे. त्या मॅडमने सांगितल्यानुसार मग मी त्या साहेबांकडे गेलो. तेव्हा त्यांना सांगितले की, वरच्या मजल्यावर काम करणाऱ्या मॅडमनी तुमच्याकडे पीपीएफच्या पुस्तकांचा गठ्ठा नगर रचनाकार कार्यालयाचा आहे. असे सांगितले आहे. तरी कृपया मला तो द्यावा म्हणून त्यांना विनंती केली. तेव्हा, त्यांनी सांगितले की, हो आहे पण, जरा काळजीपुर्वक काम करत जा. असे म्हणून त्यांनी पीपीएफच्या १५ पुस्तकांचा गठ्ठा मला दिला. तेव्हा माझ्या जीवात जीव आला. तेव्हा मला खूप बरे वाटले. मी थोडा वेळ शांतपणे बसलो. आणि मनात श्री स्वामी समर्थांना साष्टांग दंडवत घातले. पोष्टातील त्या साहेबांकडून मी जेंव्हा तो पासबुकांचा गठ्ठा घेतला. तेव्हा त्यांचे खूप खूप आभार मानले. तुमच्यामुळे मला माझे पुस्तकं आज मिळाले असे म्हणालो. तेव्हा माझ्या डोळ्यांमध्ये पाणी आले. कारण, श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेमुळेंच मला पासबुकांचा गठ्ठा मिळाला. त्यांनी मला फार मोठ्या संकटातून वाचवले.




आयुष्यभर मी त्यांचा ऋणी आहे. पोष्टातील त्या साहेबांनी मला सांगितले की, एका केळी विकणाऱ्या गाडीवाल्याने पोष्टाचा शिक्का पाहून ही पुस्तकं पोष्ट ऑफिसचीच आहेत असे वाटून पोष्ट ऑफीसमध्ये जावून त्या साहेबांना तो पुस्तकांचा गठ्ठा नेवून दिला होता. तो पोष्टमन श्री स्वामी समर्थांच्या माझ्यावरील कृपेमुळे देवदूतासारखा माझ्या मदतीला धावून आला होता. मी पोष्ट ऑफिसमधून बाहेर आल्यानंतर दूचाकीतील डीकीमध्ये ठेवण्यासाठी आरडी आणि पीपीएफच्या पुस्तकांचे गठ्ठे डीकीवर ठेवले होते. आरडीचा गठ्ठा मी डिकी उघडून डिकीत टाकला पण, दूसरा पीपीएफचा दूसरा गठ्ठा विसरुन डीकीवरच राहिला होता. डीकीला कुलूप लावून मी तसाच दूसऱ्या कामासाठी बाजारात वळसा घालून जवळच्या रस्त्याने दूचाकीवर माझ्या कामासाठी गेलो होतो. वळताना माझ्या डीकीवरील पीपीएफचा गठ्ठा डीकीवरुन खाली रस्त्यावर पडला होता. त्या रस्त्यावर थोडे पाणी साठले होते. त्यामुळे, त्या पुस्तकावरील दोरीने बांधलेले टाईप केलेले पत्र मातीने भिजले होते. तेथून रस्त्यावर पडलेला पासबुकचा गठ्ठा केळीच्या गाडीवरील एका केळीवाल्याला दिसला, त्यावरील पोष्टाचा शिक्का पाहून त्यानेतो पोष्ट कार्यालयात नेऊन दिला. तेव्हा हे ऐकून माझ्या जीवात जीव आला.मी तो पासबुकाचा गठ्ठा घेतला, आणि श्री स्वामी समर्थ महाराजांना मनोमन साष्टांग दंडवत घातला.श्री स्वामीसमर्थ महाराजांनी मला फार मोठ्या संकटातून वाचविले. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ! त्यांच्या चरणीं साष्टांग दंडवत! श्री स्वामी समर्थ!

# ए.टी.एम. कार्ड हरवलं अन्.....


ज्योतिर्मय साहित्य

अगदी ताजी ताजी म्हणजे दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी घडलेली ही घटना आहे. आमचे वडील बंधु यांचा अमृत महोत्सव दि.२६ नोव्हेंबर रोजी जालना येथे आयोजित केला होता. त्यामुळे आम्ही दि.२५ रोजी सकाळी पुणे येथुन निघून दुपारी संभाजीनगर येथे पोहोचलो.

मी सेवानिवृत्त असून माझे निवृत्तीवेतन संभाजीनगर येथील महाराष्ट्र बँकेतून अदा केले जाते. त्यामुळे जीवन प्रमाणपत्राची पुर्तता करण्यासाठी मी बँकेत गेलो. कार्यवाही पूर्ण झाली. त्यानंतर बँकेच्या शेजारी असलेल्या ए.टी.एम. कक्षात गेलो. पैसे काढले. तितक्यात माझ्या मुलाचा फोन आला. मी त्याच्याशी फोनवर बोलत बोलत घाईघाईने कक्षातून बाहेर पडलो.

थोडावेळ माझ्या लहान भावाकडे थांबून जालन्याकडे निघालो. बस मध्ये बसलो, बस सुरु झाली.

त्यावेळेस माझ्या एकदम लक्षात आले की आपले ए.टी.एम. कार्ड मशीन मध्येच राहिले. मग काय बघता, लगबग सुरु झाली. मी भावाला फोन केला व त्याला तातडीने बँकेत जाण्यास सांगितले. त्याने बँकेत धाव घेतली. चौकशी केली. कार्ड सापडले नाही. तेथील कर्मचाऱ्याने सुचविले की खातेदाराने रीतसर लेखी पत्र दिल्यानंतर कार्ड ब्लॉक करता येईल. इकडे तो पर्यंत मी माझ्या मुलाला फोनवर इत्थंभूत माहिती दिली. त्याने टोल फ्री नंबरवर बँकेशी संपर्क साधला. तेथील कर्मचाऱ्याने सांगितले की खातेदाराच्या रजिस्टर्ड मोबाइल फोनवरून तक्रार करता येईल. त्यानंतर त्या कर्मचाऱ्याशी माझे कॉन्फरन्स कॉलवर बोलणे झाले. त्यांनी माझी पुर्ण चौकशी करुन, खात्री झाल्यावर कार्ड ब्लॉक करण्याची कार्यवाही केली. सायबर क्षेत्रातील वाढत्या गुन्हेगारीमुळे व फसवणूकीच्या प्रकारामुळे मनाची घालमेल होत होती व भीतीही वाटत होती. परंतु कार्ड ब्लॉक झाल्यावर चिंता दूर झाली.




तरी पण नवीन कार्ड मिळविण्याची तळमळ कायम होती. त्यामुळे दोन दिवसानंतर परत बँकेत गेलो व कागदपत्रांची पुर्तता केल्यावर नवीन कार्ड मिळाले. तेंव्हा कुठे जीवात जीव आला.

अशा घटना प्रत्येकाच्या जीवनात केंव्हा तरी, कधी तरी घडत असतात, तेंव्हा या घटनानंतर आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे व सावध राहिले पाहिजे व ए टी एम मध्ये पैसे काढताना मोबाईल वर बोलणे टाळावे व संपूर्ण लक्ष फक्त ए टी एम वर ठेवावे.

# अगं अगं सूनबाई ! काय म्हणताय सासूबाई? चा टीझर करतोय धमाल !

ज्योतिर्मय साहित्य

झी स्टुडिओज आणि सनफ्लॉवर स्टुडिओजचा बहुचर्चित मराठी चित्रपट अगं अगं सूनबाई ! काय म्हणताय सासूबाई ? लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या पोस्टरने या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण केली होती. पाठमोऱ्या दिसणाऱ्या सासू-सुनेच्या जोडीने प्रेक्षकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण केला होता, तो म्हणजे ही जोडी नेमकी कोणाची? आणि आता या प्रश्नाचं उत्तर देत, मनोरंजनाची पूर्ण तयारी करत चित्रपटाचा धमाल टीझर प्रदर्शित झाला आहे. नुकत्याच या चित्रपटाच्या टिमने मुंबईतील महालक्ष्मीच्या मंदिरात जाऊन देवीचे आशीर्वाद घेत, चित्रपटाच्या टिझरचे आणि पोस्टरचे अनावरण केले.

या चित्रपटाच्या निमित्ताने प्रार्थना बेहरे आणि निर्मिती सावंत पहिल्यांदाच एकत्र पडद्यावर झळकणार असून, सासू-सुनेची एक हटके, ताकदवान आणि तितकीच खमंग जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे . टीझरमध्येच दोघींची जुगलबंदी, टोमणे, मिश्किल संवाद आणि भावनिक क्षण यांचा सुरेख मेळ पाहायला मिळतोय. प्रार्थना बेहरे आधुनिक, आत्मविश्वासू आणि स्पष्टवक्ती सून म्हणून दिसत आहे, तर निर्मिती सावंत पारंपरिक, ठाम मतांच्या आणि अनुभवसंपन्न सासूबाईंच्या भूमिकेत लक्ष वेधून घेत आहेत.

दोन पिढ्या, दोन विचारधारा आणि दोन कणखर स्त्रिया यांच्यातील नात्याचं गोडतिखट, हलकंफुलकं तरीही अर्थपूर्ण चित्रण या




चित्रपटाचं प्रमुख वैशिष्ट्य ठरणार आहे. समाजात नेहमी म्हटलं जातं की, प्रत्येक पुरुषाच्या मागे एक स्त्री असते, परंतु एका स्त्रीच्या मागे दुसरी स्त्री ठामपणे उभी राहिली तर, ती नाती किती बळकट होऊ शकतात, हाच विचार हा चित्रपट अतिशय सहज आणि प्रभावीपणे मांडतो.

दिग्दर्शक केदार शिंदे म्हणतात, ही कथा आजच्या काळातील सासूसुनेच्या नात्याची आहे. दोघीही स्वतंत्र विचारांच्या आहेत, स्वतःच्या मतांवर ठाम आहेत. त्यामुळे मतभेद होतात, नोकझोक होते, परंतु त्याचबरोबर दोघींच्या समजूतदारपणाची आणि त्यांच्या तरल नात्याची सुंदर कहाणी यात आहे. सासू आणि सून एकमेकींच्या आयुष्यात आधार बनू शकतात, ही भावना या चित्रपटाचा गाभा आहे.’’

झी स्टुडिओजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणतात, प्रेक्षकांना केवळ मनोरंजन नव्हे, तर विचार करायला लावणारा आशय देण्यावर आमचा भर असतो. ‘अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?’ हा चित्रपट हसवेलही आणि नात्यांकडे पाहाण्याचा एक वेगळा दृष्टिकोनही देईल.’’

झी स्टुडिओजचे उमेश कुमार बन्सल म्हणतात, आज स्त्रियांचं नातं केवळ संघर्षाचं नाही, तर एकमेकांना आधार देणारंही आहे. एका स्त्रीच्या पाठीशी दुसरी स्त्री उभी राहिल्यास काय बदल घडू शकतो, हे आम्ही या कथेतून दाखवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.’’

कधी हसवणारी तर कधी मनाला भिडणारी आणि आजच्या काळातील सासू सुनेच्या नात्यातील बंध उलगडणारी ही कथा, दोन पिढ्यातील स्त्रियांच्या नातेसंबंधाचं सामर्थ्य अधोरेखित करते. टीझर पाहून एक गोष्ट मात्र नक्की, ‘अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?’ हा चित्रपट सासूसुनेच्या नात्याची एक नवी, ताजीतवानी आणि विचारप्रवर्तक ओळख देणारा आहे.

झी स्टुडिओज व सनफ्लॉवर स्टुडियोज निर्मित ‘अगं अगं सूनबाई !काय म्हणताय सासूबाई?’ चित्रपटाचे दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केले असून सना शिंदे, उमेश कुमार बन्सल यांची निर्मिती आहे. चित्रपटाची कथा आणि संवाद वैशाली नाईक व ओमकार मंगेश दत्त यांची असून पटकथा वैशाली नाईक यांची आहे. तसेच चित्रपटाचे छायाचित्रण व संकलन मयूर हरदास यांनी केले आहे. येत्या १६ जानेवारी पासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559